ढाणकी येथील मुस्लिम समाजाने बकरी ईदचा सण शांती, प्रेम आणि सौहार्दाने उत्साहात केला साजरा >> पान 2

राहुल गांधींच्या लेखाने राजकीय भूकंप, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील फिक्सिंगची चौकशी का करत नाही : सपकाळ >> पान 3

बुलढाणा आगारात पाच नवीन एसटी बस >> पान 4



दैनिक

# आपला विदर्भ

सुविचार

आपल्या शब्दांचा आदर करा.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 267 ■ रविवार, दि. 08 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




महिलेला नग्न दाखवल्याने १०० लोक आणखी येतील असं त्यांना वाटतं, स्मिता पाटील यांची जुनी मुलाखत व्हायरल

आतील पान

# लोकोपयोगी कायदे करण्यात महाराष्ट्र देशात अग्रेसर : मुख्यमंत्री फडणवीस

## विधी विधान शाखेचे बोधचिन्ह अनावरण व पुस्तक प्रकाशन

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र हे देशात सर्व क्षेत्रात अग्रगण्य राज्य आहे. लोकोपयोगी कायदे निर्मितीमध्येही राज्य देशात अग्रेसर असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढत राज्याच्या कायद्याचे अनुकरण देशातील इतर राज्यच नाही, तर अन्य देशही करत असल्याचे सांगितले. विधी व न्याय विभागाच्या सुवर्ण म होत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात विधी विधान शाखेचे बोधचिन्ह अनावरण आणि पाच पुस्तकांचे प्रकाशन सह्याद्री अतिथी गृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, विधी व न्याय विभागाचे राज्यमंत्री ड आशिष जयस्वाल, मुख्य सचिव सुजाता सौनिक, प्रधान सचिव सुवर्णा केवले, प्रधान सचिव व विधी सल्लागार श्री शुक्ला, विधी विधान शाखेचे सचिव सतीश वाघोले आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये विधी व न्याय विभागाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. कायदा निर्मितीमध्ये विधी व न्याय विभागाचे महत्त्वपूर्ण योगदान असते. राज्याचे अनेक कायदे देशाने स्वीकारले आहेत. कायदा निर्मिती होत असताना विधिमंडळात कायद्यांवर तीन – तीन दिवस चर्चा झालेली आहे. चर्चेतून कायदा अस्तित्वात येत असतो. या विभागाचे सुवर्ण म होत्सवी वर्ष असून निश्चितच या विभागात ' ट्रान्सफॉर्मेशन' ची सुरुवात या वर्षापासून करावी.

सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन लोकोपयोगी कायदे निर्मिती करावी लागते. या संपूर्ण प्रक्रियेत कायदा ' ड्राफ्टिंग ' अत्यंत महत्त्वाचे असते. लोकांच्या हिताच्या दृष्टीने कायदा कसा असावा, असा प्रयत्न नेहमी शासनाचा असतो. विधी व न्याय विभागाने निर्मित केलेली पुस्तके पुढील पिढीसाठी ठेवा आहे. हे संदर्भ साहित्य म्हणून निश्चितच कायदा निर्मितीमध्ये उपयोगात येणार आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

विभागाच्या बळकटीकरणासाठी दिलेल्या प्रस्तावाबाबत शासन सकारात्मक असून निश्चितच याबाबत निर्णय घेतला जाईल. प्रशिक्षण ही महत्त्वाची बाब आहे. विभागात कायमस्वरूपी प्रशिक्षण धोरण असावे. तसेच काही प्रशिक्षण बंधनकारक करण्यात यावीत. तंत्रज्ञान व कार्यपद्धतीत होत असलेल्या बदलांशी अनुरूप प्रशिक्षण धोरण असावे. आंतरवासिता कार्यक्रमांमध्ये ग्रामीण भागातील विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची संख्या वाढवून या कार्यक्रमाची व्याप्ती विस्तृत करण्यात यावी, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

प्रस्ताविक सचिव सतीश वाघोले यांनी केले. त्यांनी विभागाची रचना, आव्हाने आणि विभागाची कार्यपद्धती विषद केली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उपसचिव श्रीमती विनायक कुळीवार यांनी केले. कार्यक्रमास विधी व न्याय विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## 'वर्क फ्रॉम होम'च्या नावाखाली रत्नागिरीत महिलेची ऑनलाईन ९ लाख ९६ हजार ९९१ रुपयांची फसवणूक

**दैनिक आपला विदर्भ**

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** रत्नागिरी शहराच्या जवळच असणा-या कुवारबांव येथे एका महिलेची 'वर्क फ्रॉम होम'च्या नावाखाली ऑनलाईन ९ लाख ९६ हजार ९९१ रुपयांची फसवणूक झाल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी रत्नागिरी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, हा प्रकार ८ मे २०२५ ते २७ मे २०२५ दरम्यान घडली असून, ६ जून २०२५ रोजी याबाबत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. रोहिणी मंदार गीते (वय ४५) रा. साईगण, वृंदावन सोसायटी, कुवारबांव, रत्नागिरी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, काही अज्ञात आरोपींनी इन्स्टाग्राम या सोशल मीडिया ॲपवर 'वर्क फ्रॉम होम' संदर्भात एक जाहिरात ठेवली होती. स्केचर्स कंपनीमध्ये कामासाठी त्यांना टेलिग्राम अकाऊंटवर माहिती देण्यात आली.

सुरुवातीला कस्टम ऑर्डरसाठी भरलेल्या रकमेवर त्यांना योग्य परतावा देण्यात आला. त्यानंतर, रोहिणी गीते यांनी बँक ऑफ इंडिया आणि डोंबिवली नागरी सहकारी बँकेच्या खात्यांमधून एकूण ९,९६,९९१ रुपये आरोपींच्या खात्यात जमा केले. मात्र, या रकमेवर त्यांना कोणताही परतावा मिळाला नाही. तसेच गुंतवलेली मूळ रक्कमही परत मिळाली नाही. यात त्यांची फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली.

## वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणातील सहआरोपी निलेश चव्हाणला न्यायालयीन कोठडी

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** वैष्णवी हगवणे प्रकरणात सहआरोपी करण्यात आलेल्या निलेश चव्हाण याची पोलीस कोठडी संपल्यावर शनिवारी त्याला न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. न्यायालयात झालेल्या सुनावणीत निलेश चव्हाण याला १९ जूनपर्यत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. निलेश चव्हाण याला भारत – नेपाळ सीमेवरुन पोलिसांनी अटक केली होती.



निलेश चव्हाणला न्यायालयीन कोठडी : वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या हगवणे कुटुंबियांना याआधीच न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली होती. या प्रकरणात वैष्णवीचं बाळ लपवून बाळाची हेळसांड केल्याचा आरोप निलेश चव्हाण याच्यावर आहेत. या प्रकरणी निलेश चव्हाण याला सहआरोपी करण्यात आलं होतं. यानंतर निलेश चव्हाण हा पळून गेला होता. पोलिसांनी चव्हाण याला नेपाळ सीमेवरून अटक केली होती. आता या प्रकरणी निलेश चव्हाण याला न्यायालयानं १९ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

बाळ हेळसांड प्रकरणाचा तपास करायचाय : न्यायालयात झालेल्या मागील सुनावणीत (३ जून) सरकारी वकिलांनी युक्तिवादामध्ये म्हटलं होतं की, ''निलेश चव्हाण याच्याकडून मोबाईल जप्त करण्यात आलाय. तसंच हगवणे कुटुंबियांचे २ मोबाईल निलेशकडे आहेत. निलेश आणि हगवणे कुटुंबिय यांच्यात चॅटिंग झालं आहे. तसंच निलेश आणि हगवणे यांच्यात आर्थिक व्यवहार झाले आहेत. >> पान २

## एकतर्फी प्रेमातून मित्रानेच काढला जीवलग मित्राचा काटा, कोल्हापुरातील धक्कादायक घटना

**दैनिक आपला विदर्भ**


**कोल्हापूर/प्रतिनिधी :** एकतर्फी प्रेमात अडसर बनणाऱ्या मित्राला दगडाच्या खाणीत ढकलून खून केल्याची धक्कादायक घटना समोर आलीय. ही घटना गेल्या बुधवारी (दि.३) केर्लेपैकी हनुमान नगरमध्ये घडली. महेंद्र प्रशांत कुंभार (वय १८) असं खून झालेल्या मुलाचं नाव असून सुरुवातीला हा अपघात असल्याचं निदर्शनास आलं होतं. मात्र पोलिसांच्या तपासादरम्यान हा घातपात असल्याचा संशय पोलिसांना आला आणि त्यानुसार तपास केल्यानंतर धक्कादायक माहिती समोर आलीय. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, करवीर तालुक्यातील पोर्ले तर्फे ठाणे येथील केर्ले गावात महेंद्र आणि अल्पवयीन संशयित आरोपी हे दोघं लहानपणीपासूनचे जिवलग मित्र होते. तर महेंद्रचं गावातील एका मुलीसोबत प्रेम संबंध होते. मात्र त्याच मुलीवर संशयित आरोपीचं देखील एकतर्फी प्रेम होतं. दरम्यान, महेंद्र आणि मुलगी एकमेकांशी बोलतात, भेटतात आणि फिरत असल्याचा राग संशयित आरोपीच्या मनात होता. >> पान २

## राहुल गांधी यांचा निवडणूक आयोगावरील आरोप, सत्ताधाऱ्यांचा पलटवार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचा आरोप करत निवडणूक चोरल्याचा हल्लाबोल केला आहे. राहुल गांधी यांनी एका वृत्तपत्रातील लेखामध्ये विविध टप्प्यांमध्ये कथित षडयंत्राचा आराखडा मांडला. यामध्ये राहुल गांधी यांनी महाराष्ट्रात मतदानानंतर अचानक ७.८३ टक्के मतदान टक्केवारी वाढणं, ही इतिहासातील अभूतपूर्व घटना असल्याचं म्हटलं आहे. त्यांनी या सर्व घडामोडींना 'मॅच-फिक्सिंग' असल्याचं म्हटलं आहे. जिथं निकाल आधीच ठरवला होता. शेवटी ते मॅच फिक्स झालेली निवडणूक ही लोकशाहीसाठी विष असल्याचं मत मांडतात. या आरोपानंतर विविध पक्षातल्या राजकीय नेत्यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत.

''मी बघितलं नाही, मी बघून सांगतो, ते रोजच आरोप करत आहेत. त्याला काय उत्तर द्याचं काय?'' अशी प्रतिक्रिया राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ''आज सकाळी मी आणि पवार साहेबांनी राहुल गांधी यांचा लेख वाचला आहे. त्यावर चर्चाही झाली. काँग्रेसनं यापूर्वी निवडणूक आयोगामध्ये धाव घेतली आहे. ही माहिती आयोगाला दिली आहे. त्यामुळं निवडणूक आयोगानं यामध्ये पारदर्शकपणे चौकशी करावी, अशी मागणी काँग्रेस पक्षानं केली आहे. त्यामुळं आता आम्ही



निवडणूक आयोगाचे यावर काय उत्तर येते याची वाट बघतोय,'' अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली आहे.

लोकांना संभ्रम नको, विकास हवा : ''राहुल गांधी यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाच्या अजेंड्यावर काही बोलता येत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकासाचा संकल्प केला आहे. पुढील पंधरा-वीस वर्षे त्यांना काय समोर दिसत नाही. म्हणून ते सतत देशात >> पान २

# विधानसभा निवडणुकीत मतांवर टाकलेल्या दरोड्याची चौकशी करा ?- नाना पटोले

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** लोकसभा निवडणुकीत घवघवीत विजय मिळवलेल्या महाविकास आघाडीचा पाच महिन्यातच झालेल्या विधानसभा निवडणुकीत मोठा पराभव होतो हे अनाकलनीय आहे. रात्रीच्या अंधारात मतांवर दरोडा टाकून भाजपा युती निवडणूक आयोगाच्या मदतीने विजयी झाली आहे. राहुल गांधी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर निवडणूक आयोग पुराव्यासह खुलासा का करत नाही, असा संतप्त सवाल काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी विचारला आहे.

यासंदर्भात प्रतिक्रीया देताना नाना पटोले म्हणाले की, निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार मतदानाच्या दिवशी



संध्याकाळी ५ वाजता ५८.२२ टक्के मतदान झाले, त्याच रात्री ११.३० वाजता ते ६५.०२ टक्के तर दुसऱ्या दिवशी २१ नोव्हेंबर रोजी हेच मतदान ६६.०५ टक्के झाल्याचे सांगितले, यात एकूण ७.८३ टक्के वाढ झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. तब्बल ७६ लाख मतांची ही वाढ असून मतदानाचा टक्का कसा वाढला? हा मतांवर सरळ सरळ दरोडा टाकलेला आहे. चंदिगड महानगरपालिकेच्या निवडणुकीत मतपत्रिकेत कसा घोटाळा करून भाजपाला विजयी घोषित केले होते हे सीसीटीव्ही कॅमेऱ्यातून जगाने पाहिले आहे. वारणसी लोकसभा मतदारसंघात सुरुवातीपासूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी पिछाडीवर होते नंतर यंत्रणा कामाला लागली व निकाल वेगळा लागला हे उघड झाले आहे. निवडणूक काळात भाजपाच्या मर्जितील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना कशी जबाबदारी दिली हेही उघड आहे. भाजपाने निवडणूक आयोगाच्या मदतीने निवडणूक जिंकलेली आहे. लोकशाहीला हा कलंक असून निवडणूक आयोगाच्या विश्वासाहर्तेवरही मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिलेले आहे.


नाना पटोले पुढे म्हणाले की, काँग्रेसने मतांच्या चोरीचा प्रश्न उपस्थित केला असता भाजपा नेतेच त्याला उत्तर देत आहेत. नागपूर अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: निवडणूक आयोगाची बाजू मांडली. आताही फडणवीस, बावनकुळे हे निवडणूक आयोगाची बाजू मांडत आहेत. भाजपाचे नेते निवडणुक आयोगाचे वकील आहेत का. शिर्डी मतदारसंघात ७ हजार मतदार कसे वाढवले याचे पुरावे आहेत. ज्या मतदारसंघात मतदारांची जेवढी मतदार संख्या बोगस पद्धतीने वाढविली तेवढेच मताधिक्य त्या मतदारसंघात भाजपाला मिळाले आहे. आम्ही पुराव्यानिशी मतदारयाद्यातील घोटाळा व बोगस मतदान दाखवतो, हिम्मत असेल तर भाजपा नेत्यांनी ते खोडून दाखवावे, असे आव्हान नाना पटोले यांनी दिले आहे.

## राहुल गांधी यांच्याबाबत फडणवीस म्हणाले, "त्यांना खोटे बोलण्याची सवय लागली"

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील मतांच्या टक्केवारी बाबात घेण्यात आलेल्या आक्षेपावर निवडणूक आयोगाने आकडेवारी सह प्रमाण दिले आहे. पण, काँग्रेस नेते राहुल गांधींनाना खोटे बोलण्याची सवय लागली आहे. ते खोटे बोलून स्वत:च्या मनाला समजावत आहे. जोपर्यंत हे सत्य स्वीकारून जागे होऊन जमिनीवर काम करणार नाही तोपर्यंत त्यांच्या पक्षाला कुठलाही भवितव्य उरलेले नाही, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

दैनिक लोकसत्ता मध्ये शनिवारी प्रकाशित राहुल गांधी यांच्या लेखावर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना प्रतिक्रिया दिली. गांधी यांनी महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीतील मत घोटाळ्यावर भाष्य केले होते. ते आज विदर्भ पाणी परिषदेसाठी नागपुरात आले होते. राहुल गांधी यांच्या लेखाबाबत विचारले असता फडणवीस म्हणाले, राहुल



गांधी यांनी बिहारमध्ये हार मानलेली आहे. तर, पण राहुल गांधी जमिनीवर उतरणार नाही. स्वत:शीच खोट बोलणे सोडणार नाही, खोटे आश्वासनाने दिलासा देण्याचे सोडणार नाही, तोपर्यंत त्यांचा पक्ष कधीही निवडणुकीत जिंकणार नाही, त्यांना जागे व्हावे लागेल, वस्तुस्थिती समजून घ्यावी लागेल.

अशा पद्धतीने खोटं ते नेहमी बोलत असतात मतदारांचा अपमान करत असतात. राहुल गांधीने महाराष्ट्राच्या मतदारांचा अपमान केला आहे. राहुल गांधी जे बोलतात ते त्यांनाही माहित नसते ऐकणाऱ्या समजत नाही.

रोज खोटे बोलले की लोकांना खरे वाटते असे राहुल गांधींना >> पान २

## मुलांनो मैदानात या......

आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग समजले जाते. २१ व्या शतकातील या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोन, इंटरनेट हे प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. केवळ घरातील मोठ्या माणसंकडेच नव्हे तर शाळकरी मुलांकडे देखील मोबाईल फोन पाहायला मिळत आहे. कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी घेऊन दिलेला मोबाईल अजूनही मुलांच्या हातात आहे. हाच मोबाईल आज मुलांचा सर्वात जवळचा सहकारी बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मुले मोबाईललाच चिकटून बसलेली असतात. आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगात मोबाईल हा गरजेचा आहे. तो गरजेपुरातच वापरला गेला पाहिजे मात्र आज मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व होऊन बसले आहे. आजच्या मुलांना मोबाईलने भुरळ घातली आहे. दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल वरच असल्याने मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटत चालली आहे त्यामुळे मुलांचे बालपण हरवत चालले की काय अशी शंका मनात येते. आजची मुले जास्त प्रमाणात टीव्ही, संगणक, मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, व्हाट्सएप, फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियात दंग असतात. तंत्रज्ञानरुपी राक्षसानं मुलांचं बालपणच खाऊन टाकलंय. पूर्वी शाळांना सुट्ट्या लागल्या की गावागावातील मैदाने मुलांनी भरून गेलेली असायची पण आज ती मैदाने विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात ओस पडली असल्याचे चित्र पाहायला मिळते. क्रिकेट वगळता एकही मैदानी खेळ खेळताना मुले दिसत नाहीत. देशी खेळ तर आजच्या मुलांना माहीतच नाहीत. गोट्या, भोवरे, विटीदांडू खेळताना कोणी दिसत नाही. आट्यापाट्या आणि सुरपारंब्या या खेळाचे नियम तर सोडाच पण नावही आजच्या मुलांना माहीत नाही. मोठे रिंगण घेऊन त्यात गोट्यांचा डाव लावल्याचे चित्र आज पाहायला मिळत नाही. गलगुट करून खेळणे व त्यावर राज्य द्यावे लागल्याचे हल्लीच्या मुलांमध्ये ऐकिवातही नाही. भोवऱ्याच्या रिंगणाचीही तीच अवस्था. दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक करीत बसलेला मुलगा शोधूनही सापडेनासा झाला आहे. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून खेळला जाणारा रप्पाधप्पीचा खेळ हल्लीच्या मुलांना माहीतही नाही. लपंडाव, विटीदांडू,, लगोरी, कुरघोडी, चंपूल, उडाणटप्पू हे खेळ आता दुर्मिळ झाले आहेत. लंगडी हा खेळ आता फक्त शाळेतील पिटी च्या तासापूरता उरला आहे. या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम व्हायचा शिवाय संघभावना, एकी, आपुलकी, नेतृत्व हे गुण या खेळांमुळे मुलांमध्ये विकसित व्हायचे. या खेळाची जागा आता टीव्ही, संगणक, मोबाईल व्हिडीओ गेम यांनी घेतली आहे. टीव्ही, संगणक, व्हिडीओ गेममुळे मुलांना विविध खेळांची माहिती उपलब्ध होऊन त्यातून मुलांचा बौद्धिक विकास होतो असे वाटत असले तरी त्यांचा शारीरिक विकास खुंटत चालला आहे याचा समाजातील सर्व घटकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मुलांना पुन्हा मैदानाकडे आणण्याची जबाबदारी पालक, शिक्षक व समाजातील सर्वच घटकांची आहे.

# ढाणकी येथील मुस्लिम समाजाने बकरी ईदचा सण शांती, प्रेम आणि सौहार्दाने उत्साहात केला साजरा

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** ७ जून २०२५ रोजी संपूर्ण भारतात बकरी ईद साजरी करण्यात आली. हा सण त्याग, समर्पण आणि अल्लाहवरील अढळ श्रद्धेचे प्रतीक असल्याने बकरी ईद च्या दिवशी ढाणकी येथील मुस्लिम समाजाने ईदगाह येथे ईदची नमाज पठण केली. आणि एकमेकांना मिठी मारून आणि आशीर्वाद देऊन



साजरा केला. त्यानंतर महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ व महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम १९९५ (सुधारणा ४ मार्च २०१५) कायद्याचे पालन करत बिटरगाव पोलीस स्टेशन ठाणेदार कैलाश भगत यांनी घेतलेल्या शांतता समिती मिटिंग अंतर्गत मुस्लिम समुदायाला दिलेल्या निर्देशननुसार , मुस्लिम समाजाने एकाही गोवंशाची कुर्बानी दिली नाही.फक्त बकऱ्यांची कुर्बानी देण्यात आली आणि कुर्बानीचे मांस गरीब आणि गरजूंमध्ये वाटप करताना, मुस्लिम समाजाने हिंदू बांधवांच्या भावनाना कोणतीही ठेच पोहचू नये याची पूर्ण काळजी घेतल्या गेली . मुस्लिम समाजाला बकरी ईद अल्लाहवर भक्ती आणि श्रद्धा, त्याग आणि इतरांना मदत करणे, परस्पर प्रेम आणि बंधुता शिकवते. याची प्रचिती देत ढाणकी येथील मुस्लिम समाजाने शांतता, प्रेम आणि सौहार्दाने बकरी ईदचा सण साजरा केला.

## 'माझा चेहरा जरा बरा आहे, तो वापरुन आगामी निवडणुकीला सामोरं जाऊ'; अजित पवार यांनी उघड केले मनसुबे

**पुणे/प्रतिनिधी :** आगामी महापालिकेच्या निवडणुकीच्या संदर्भात सर्वच पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. पुणे तसेच राज्यातील इतर महापालिका निवडणुकीसाठी महायुती म्हणून भाजपा, राष्ट्रवादी आणि शिवसेना एकत्र लढणार असल्याची चर्चा आहे. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी आगामी महापालिकेच्या निवडणुकीसाठी पुणे, पिंपरी चिंचवड आणि ग्रामीण भागात माझा चेहरा पुढं करून जनतेला सामोरं जाण्याचं काम करू, असं स्पष्ट करुन आपले मनसुबे उघड केले आहेत.

माझा चेहरा जरा बरा आहे – अजित पवार : उपमुख्यमंत्री अजित पवार शुक्रवारी पुणे दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बैठकीत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना मोठ विधान केलं

## 'समृद्धी'वरील पुलाचं उरलेलं काम अजित पवारांच्या नजरेतून सुटलं नाही; भर कार्यक्रमात प्रश्न विचारल्यावर फडणवीस म्हणाले, ''दादांचं लक्ष''

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** मुंबई समृद्धी महामार्ग आता पूर्णपणे लोकांच्या सेवेत दाखल झाला आहे. गुरुवारी (५ जून) या महामार्गाच्या इगतपुरी ते आमणे या ७६ किमी लांबीच्या चौथ्या व शेवटच्या टप्प्याचे लोकार्पण पार पडले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या महामार्गाचं लोकार्पण झालं. या लोकार्पणाच्या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, कॅबिनेटमधील इतर मंत्री व अधिकारी उपस्थित होते. इगतपुरी येथील बोगद्यातील उत्तरेकडील मार्गिकेवर लोकार्पणाचा मोठा सोहळा पार पडला. तत्पूर्वी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी कारने या बोगद्यातून प्रवास केला.

दरम्यान, या लोकार्पणावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या एका कृतीने सर्वांचं लक्ष वेधलं. समृद्धी महामार्गावरील एका पूलाकडे अजित पवारांनी सर्वांचं लक्ष वेधलं. या पुलाच्या सर्व खांबांवर रंगरंगोटी करण्यात आली आहे. मात्र, या पूलाच्या एका खांबाला रंग दिलेला नाही. हे पाहून अजित पवारांनी सर्वांना प्रश्न विचारला की त्या एका खांबालाच रंग का दिला नाही? त्यावर, कोणत्याही अधिकाऱ्याकडे उत्तर नव्हतं. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही स्थिती सांभाळली. ते आधी हसले आणि म्हणाले, ''अजित पवारांचं बरोबर लक्ष असतं. एक खांब मध्ये सुटलाय''.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ''दोन वेगवेगळ्या कंत्राटदारांना पूलाच्या रंगरंगोटीचं काम सोपवण्यात



आलं होतं. दोन्ही बाजूने त्यांचे कर्मचारी रंग मारत आले. मात्र त्या एका खांबापाशी येऊन ते थांबले असणार. या पुलाचं काम तुझ्याकडे आहे की माझ्याकडे असा प्रश्न त्यांना पडला असेल आणि त्यातून या पुलाला रंग द्यायचं राहून गेलं असेल.

महाराष्ट्रातील या मोठ्या महामार्गाच्या (समृद्धी) शेवटच्या टप्प्याचं लोकार्पण झाल्यामुळे आता संपूर्ण ७०१ किमी लांबीचा रस्ता वाहतूक सेवेत दाखल झाला आहे. त्यामुळे आता नागपूर ते मुंबई प्रवास १६ तासांऐवजी अवघ्या आठ तासांत पूर्ण करता येईल. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) तब्बल ५५ हजार कोटी रुपये खर्च करून हा ७०१ किमी लांबीचा महामार्ग बांधला आहे. राज्यातील एकूण १० जिल्हे, २६ तालुके आणि ३९२ गावांमधून जाणाऱ्या सहा पदरी शीघ्रगती महामार्गाचे काम टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात आले आणि चार टप्प्यांमध्ये त्याचे लोकार्पण पार पडले.

पान १ वरून...

### वैष्णवी हगवणे आत्महत्या

वैष्णवीचे बाळसुद्धा निलेशकडं होतं. त्यानं त्या बाळाची हेळसांड केली आणि याचा तपास करायचा आहे.''

अख्खं हगवणे कुटुंब कोठडीत : वैष्णवी हगवणे हिनं सासरकडून होणाऱ्या त्रासाला आणि छळाला कंटाळून आत्महत्या केल्याचा आरोप तिच्या माहेरच्या कुटुंबियांनी केला. हे प्रकरण सध्या राज्यभरात गाजत आहे. आत्महत्येनंतर गुन्हा दाखल करत पोलिसांनी हगवणे कुटुंबियांना अटक केली होती. फरार असलेल्या निलेश चव्हाण यालाही नेपाळ सीमेवरुन अटक केली होती. हे सर्व आरोपी आता न्यायालयीन कोठडीत आहेत.

### एकतर्फी प्रेमातून मित्रानेच

यावरूनच दोन्ही मित्रांमध्ये फेब्रुवारी महिन्यात जोरदार भांडण देखील झालं होतं.

१२५ फूट खोल खाणीत ढकलून दिलं : मंगळवारी रात्रीच्या सुमारास संशयित अल्पवयीन मुलानं महेंद्रला फोन करून खणीजवळ बोलावून घेतलं आणि दोघांमध्ये मुलीच्या विषयावरून पुन्हा वादाला सुरुवात झाली. संशयित आरोपीनं रागाच्या भरात महेंद्रचा मोबाईल हिसकावून घेऊन फोडला तसंच दुचाकीची चावी देखील फेकून दिली. शाब्दिक वादावादीचं रूपांतर हाणामारीवर झालं आणि या झटापटीत संशयित आरोपीनं महेंद्रला जोरदार धक्का देत १२५ फ ूट खोल खाणीत ढकलून दिलं. बराच वेळ महेंद्र घरी आला नसल्यामुळं कुटुंबीयांनी त्याचा शोध घेतला. यावेळी महेंद्र हा बेशुद्ध अवस्थेत खाणीत कुटुंबीयांना सापडला. त्याला तातडीनं त्याला कोल्हापुरातील सीपीआर रुग्णालयात दाखल केलं. मात्र, त्याचा मृत्यू झाला होता.

खून केल्याची कबुली : या घटनेची माहिती करवीर पोलिसांना मिळताच पोलिसांनी तपास सुरू केला. कुटुंबीयांची चौकशी केली असता मित्राचा फोन आल्यानंतर महेंद्र घराबाहेर गेल्याचं सांगण्यात आलं. त्यानंतर महेंद्र आणि संशयित आरोपीचं मोबाईल लोकेशन डिटेल्स एकच दाखवत होतं. यावरून पोलिसांनी संशयिताला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता, आपणच हा खून केल्याची कबुली त्यानं दिली. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन न्यायालयासमोर हजर केलं असता संशयित अल्पवयीन आरोपीला न्यायालयानं पंधरा दिवसांसाठी बाल सुधारगृहात रवानगी केलीय. दरम्यान, मित्रानेच मुलीसाठी मित्राचा खून केल्यानं परिसरातून हळहळ व्यक्त होतेय.

### राहुल गांधी यांचा

महाराष्ट्रात संभ्रम निर्माण करून त्यांचे राजकारण करत आहेत. लोकांना संभ्रम नको तर विकास हवा आहे. आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे विकासाच्या मुद्द्यावरून लोकांना सामोरे जात आहोत. राहुल गांधी जोपर्यंत पराभवाच्या छायेतून बाहेर येणार नाहीत तोपर्यंत त्यांचा पक्ष असाच कमजोर होत राहणार,'' असा टोला भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी राहुल गांधी यांना लगावला आहे.

### राहुल गांधी यांच्याबाबत फडणवीस

वाटत आहे. त्यामुळे त्याच त्या गोष्टी सातत्याने बोलत असतात. यापूर्वी देखील त्यांनी असा आरोप केलेला आहे. निवडणूक आयोगाने आकडेवारी सह प्रमाण दिले. रोज खोटे बोलण्याची सवय राहुल गांधी यांना लागलेली आहे. राहुल गांधी खोटे बोलून स्वत:च्या मनाला समजावत आहेत. ते जोपर्यंत हे सत्य स्वीकारून जागे होऊन जमिनीवर काम करणार नाही तोपर्यंत त्यांच्या पक्षाला कुठलाही भवितव्य उरलेले नाही. स्वत:शी खोटे बोलून स्वत:ला दिलासा देण्याचा काम राहुल गांधी करत आहे. आमच्या लाडक्या बहिणीचा अपमान राहुल गांधी करत आहे, असेही फडणवीस म्हणाले.

# महिलेला नग्न दाखवल्याने १०० लोक आणखी येतील असं त्यांना वाटतं, स्मिता पाटील यांची जुनी मुलाखत व्हायरल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** दिवंगत अभिनेत्री स्मिता पाटील यांचा एक जुना व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झालाय. या व्हिडीओमध्ये भारतीय चित्रपट आणि भारतीय प्रेक्षकांबाबत भाष्य करताना दिसत आहेत. या मुलाखतीत स्मिता पाटील म्हणाल्या होत्या की, हिरोला नग्न दाखवू शकत नाहीत. त्याने काही होणार देखील नाही. मात्र, महिलेला नग्न दाखवलं तर त्यांना वाटतं की, १०० लोक आणखी येतील. भारतीय प्रेक्षकांवर एक गोष्ट फोर्स करण्यात आलीये की, पाहा या सिनेमात सेक्स आहे. या सिनेमात अर्धनग्न शरीर आहेत. तुम्ही सिनेमा पाहायला या''...स्मिता पाटील यांचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला असून नेटकऱ्यांनी या व्हिडीओला प्रतिसाद देताना दिसत आहेत.

प्रतिभाशाली आणि संवेदनशील अभिनेत्री म्हणून स्मिता पाटील यांची ओळख

भारतीय चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाच्या जोरावर अढळ स्थान मिळवणाऱ्या अभिनेत्रींच्या यादीत स्मिता पाटील हे नाव नेहमीच गौरवाने घेतलं जातं. त्या केवळ एक अभिनेत्री नव्हती, तर समाजातील वास्तव दर्शवणाऱ्या भूमिकांची प्रखर भान असलेल्या कलाकार होत्या. त्यांच्या अभिनयातून एक प्रकारचं सत्य आणि सामाजिक जाणीव प्रकट होत असे.

स्मिता पाटील यांचा जन्म १७ ऑक्टोबर १९५५ रोजी पुणे, महाराष्ट्र येथे झाला. त्यांचे वडील शिवाजी पाटील हे सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार होते, तर आई विद्या पाटील शिक्षिका होत्या. तिचे बालपण एका सुजाण, विचारशील कुटुंबात गेले. त्यांनी पुण्यात शिक्षण घेतलं आणि त्यानंतर मुंबई विद्यापीठातून समाजशास्त्र विषयात पदवी मिळवली.

**चित्रपटसृष्टीतील पदार्पण**

स्मिता पाटील यांनी त्यांच्या करिअरची सुरुवात दुरदर्शनवरील वृत्तनिवेदिका म्हणून केली. त्यानंतर त्या श्याम बेनेगल यांच्या चरणदास चोर या चित्रपटातून रुपेरी पडद्यावर आल्या. पुढे त्यांनी निशांत (१९७५), मंथन (१९७६), भूमिका (१९७७) यासारख्या चित्रपटांतून त्यांनी आपली एक वेगळी ओळख निर्माण केली. त्या पॅरलल सिनेमा म्हणजेच समांतर चित्रपटसृष्टीचा एक महत्त्वाचा चेहरा बनल्या होत्या.

स्मिता पाटील यांच्या अभिनयातील सादरीकरण हे नेहमी संयत आणि भावपूर्ण असे. त्यांनी महिलांच्या व्यथा, संघर्ष, आत्मनिर्भरता यांचं जिवंत चित्रण केलं. त्यांचे चेहरेवरील भाव, संवादफेक आणि देहबोलीतून त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर कायमची छाप सोडली.

**महत्वाचे चित्रपट**

भूमिका (१९७७) यात एका गायक स्त्रीची आत्मकहाणी साकारली.

मंथन (१९७६) शेतकऱ्यांच्या दुग्धक्रांतीशी संबंधित चित्रपट.

चक्र (१९८१) झोपडपट्टीत राहणाऱ्या स्त्रीचा संघर्ष.

आक्रोश, अर्धसत्य, नमक हलाल, बाजार, मिर्च मसाला, मिर्झा गालिब हे इतर उल्लेखनीय चित्रपट होते.

त्यांनी काही हिंदी व्यावसायिक चित्रपटांतही काम केलं जसं की नमक हलाल, शक्ति आणि सौदागर.

पुरस्कार आणि सन्मान

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार भूमिका (१९७७) चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्री.

फिल्मफेअर पुरस्कार अनेक नामांकित चित्रपटांसाठी.

पद्मश्री पुरस्कार १९८५ मध्ये भारत सरकारकडून सन्मानित.

स्मिता पाटील यांनी अभिनेते राज बब्बर यांच्याशी विवाह केला होता. त्यानंतर त्यांना प्रतीक बब्बर नावाचा एक मुलगा आहे, जो आज अभिनेता आहे. दुर्दैवाने, १३ डिसेंबर १९८६ रोजी वयाच्या ३१ व्या वर्षी स्मिता पाटील यांचे निधन झाले. त्यांच्या अकाली मृत्यूने चित्रपटसृष्टी हादरून गेली होती..स्मिता पाटील यांची ओळख एक विचारशील आणि स्त्रीवादी अभिनेत्री म्हणून होती.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# राहुल गांधींच्या लेखाने राजकीय भूकंप, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील फिक्सिंगची चौकशी का करत नाही : सपकाळ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये मतदानाची चोरी करून भाजपा युती सरकार सत्तेत आले आहे. अचानक वाढलेले मतदान हे अनौरस, बोगस असल्याने काँग्रेस पक्षाने या सर्व प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली पण चौकशी काही केली जात नाही. राहुल गांधी यांनी संसदेत व संसदेबाहेरही हा प्रश्न लावून धरला आहे. आज देशभरातील प्रमुख वर्तमानपत्रात त्यांचा या विषयावर लेख प्रकाशित झाल्याने राजकीय भूकंप झाला असून निवडणूक फिक्सिंगच्या चौकशीची मागणी होत आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे. टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पुढे म्हणाले की, काँग्रेस पक्ष व राहुल गांधी यांनी मतदानाच्या घोटाळ्याचा प्रश्न आकडेवारीसह मांडला आहे, हा आरोप नाही तर तथ्य व आकडेवारीसह त्याची मांडणी करून



चौकशी करावी अशी मागणी केलेली आहे. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेतील दीड तासाच्या भाषणात यावर चकार शब्दही काढला नाही. हा लोकशाही व्यवस्थेवर निर्माण झालेला गंभीर व चिंताजनक मुद्दा आहे. काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने निवडणूक आयोगाकडेही हा मुद्दा सविस्तरपणे मांडला पण त्यांनी खुलासा करून वस्तुस्थिती मांडण्याची गरज असताना त्याकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर नियमातच बदल करून व्हिडीओ रेकॉर्डिंग आणि ण्ण्ऊ% फुटेज व माहिती देता येणार नाही असा नवा फतवा काढला आहे, हा लोकशाहीवरचा घाला आहे. काही गौडबंगाल नाही तर माहिती का लपवली जात आहे?, हा प्रश्न उपस्थित होत आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आकडेवारी देत पुढे म्हणाले की, २०१९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर २०२४ च्या निवडणुकीपर्यंत ५ वर्षात महाराष्ट्रात ३१ लाख मतदार संख्या वाढली पण २०२४ लोकसभा निवडणूक ते २०२४ विधानसभा निवडणूक या अवघ्या ५ महिन्यात ४१ लाख मतदार वाढले यातच मोठे गौडबंगाल आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या मतदानाच्या टक्केवारीवरही संशय बळावला आहे. २००४ च्या निवडणुकीत प्राथमिक मतदानाची आकडेवारी ६० टक्के होती ती अंतिम ५९.५ टक्के झाली. २०१४ साली प्राथमिक मतदान ६२ टक्के तर अंतिम ६३ टक्के झाल्याचे जाहीर केले. २०१९ साली प्राथमिक टक्केवारी ६०.४६ टक्के होती तर अंतिम टक्केवारी ६१.१० टक्के होती परंतु २०२४ च्या निवडणुकीत मात्र मतदानाची प्राथमिक टक्केवारी ५८.२२ टक्के असताना अंतिम टक्केवारी मात्र ६६.५ टक्के जाहीर करण्यात आली, ही तब्बल ८ टक्क्यांची वाढ हाच कळीचा मुद्दा आहे. आधीच्या चार-पाच निवडणुकीतील मतदानात १ टक्क्यांचीही तफावत नसताना २०२४ च्या निवडणुकीत ८ टक्के तफावत कशी? वास्तविक पाहता आधुनिक तंत्रज्ञानाने सर्व यंत्रणा अद्यावत झालेल्या असताना अशा पद्धतीने घोळ कसा काय झाला, याचे उत्तर निवडणूक आयोग देत नाही. मतांच्या चोरीचा मुद्दा एवढ्यावरच थांबत नाही तर जे प्रश्न निवडणुक आयोगाला विचारले त्यांनी उत्तर देणे अपेक्षित असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याचे उत्तर देत आहेत, ते का? आता हाच मतदान चोरीचा पॅटर्न आगामी बिहार विधानसभा निवडणूक, मुंबई महानगरपालिका निवडणूक व राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीतही वापरण्याचे षडयंत्र असल्याचा गंभीर आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

## रंगधर्मी अजित भगत : नाट्यविद्यापीठ आणि प्रायोगिक नाटकाचे शेवटचे भीष्माचार्य : मालुसरे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी प्रायोगिक रंगभूमीच्या पायाचे जे काही जे काही घट्ट दगड त्यातला एक पायरीचा दगड...म्हणजे अजित भगत. दादरच्या आविष्कार मध्ये म्हणजे छबिलदास शाळेचा दुसरा मजल्यावर जी आधाराची वा हक्काची आपली वाटावी अशी जी माणसे त्यात अरुण काकडे, सीताराम कुंभार आणि अजित भगत सर होते, मात्र त्यापेक्षा ज्या रंगभूमीची धूळ आपण गुलालासारखी कपाळाला लावली त्या पायरीचा आपण अविभाज्य भाग आहोत ह्याचा अभिमान मला जास्त महत्वाचा आहे असे भगत सर स्वतःला समजत असत. अजित भगत यांच्या निधनाने प्रायोगिक नाटक 'जगणारे रंगधर्मी', चालते बोलते नाट्यविद्यापीठ'. प्रायोगिक नाटकाचे 'शेवटचे भीष्माचार्य' आपल्यातून कायमचे विंगेत गेले आहेत असे भावपूर्ण उदगार रवींद्र मालुसरे यांनी काढले. श्री विघ्नहर्ता प्रतिष्ठान मुंबई आयोजीत नाट्यतपस्वी अजित भगत स्मृती जागर नुकताच यशवंत नाट्य मंदिरच्या मिनी थिएटर मध्ये नुकताच साजरा झाला.

त्यावेळी मालुसरे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. नाट्यचळवळीसाठी गेली ४० वर्षे निःस्वार्थीपणे विघ्नहर्ता प्रतिष्ठान जे प्रशंसनीय काम करीत आहे त्याचे कौतुक ज्येष्ठ लेखक आणि प्रकाशक डॉक्टर सुनील सावंत यांनी आपल्या भाषणात केले. तर ज्येष्ठ रंगकर्मी चेतक घेगडमल यांनी प्रायोगिकसाठी अजित भगत यांनी दिवसरात्र केलेली मेहनत आणि त्यांच्या अनेक आठवणी जाग्या भाषणात केल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विघ्नहर्ता संस्थेचे अध्यक्ष श्री दत्ता मोरे म्हणाले, अजित भगत यांचा मिश्किल, प्रेमळ, धाक वाटणारा चेहरा डोळ्यासमोर आहे. मित्र आणि मार्गदर्शक म्हणून मलाच नव्हे तर शेकडोंना ते मोठे होते. प्रायोगिक रंगभूमीवर मैलाचा दगड ठरलेली अनेक नाटके अजित सरांनी दिग्दर्शित केली. नाटक जगणारा हा माणूस होता.साध्या माणसांचा दिग्दर्शक होता.

यावेळी श्री नंदकुमार सावंत, श्रीमती चित्रा अरुण भगत, कथा लेखिका विद्या निकम, विजय सक्रे, राज जैतपाल, अमन दळवी, जयवंत सातोसकर यावेळी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ज्येष्ठ नाट्यलेखक आणि रंगकर्मी महेंद्र कुरघोडे यांनी कार्यक्रमाचे सुंदर प्रास्ताविक केले. लेखक महेंद्र कुरघोडे लिखित मिशन विक्टरी, चांद तारा आणि मोक्ष या राज्यस्तरीय पारितोषिक विजेत्या नाटकांच्या कलाकारांचा सन्मान करण्यात आला.

## जोतिबाच्या घाटात बायकोचा खून करून पती फौजदार चावडी पोलिस ठाण्यात हजर

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** कोल्हापूर परिसरातील जोतिबा मंदिराकडे जाणाऱ्या घाटमार्गात निर्जनस्थळी चाकूने वार करून चारित्र्याच्या संशयावरून पत्नीला ठार केले. त्यानंतर आरोपी पतीने आज सोलापुरातील फौजदार चावडी पोलिस स्टेशन गाठत खुनाची हकिकत सांगितली. दरम्यान, पोलिसांनी आरोपी पतीला कोल्हापूर पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. सचिन चंद्रशेखर राजपूत (वय ३४, रा. कालबिलागी, ता.जमखंडी)याने चारित्र्याच्या संशयावरून पत्नी शुभांगीचा (वय २८, रा. कालबिलागी, ता. जमखंडी,बागलकोट) खून केल्याचे सांगितले.





आरोपी सचिन हा बागलकोट जिल्ह्यातील असून तो अहमदाबाद येथे भारतीय सैन्यदलात ८ वर्षे होता. त्याने एका महिलेसोबत अश्लील वर्तन केलेच्या कारणावरून त्याला सैन्यदलातून बडतर्फ केले होते. तो मोटारसायकलवरून सोलापुरातील फौजदार चावडी पोलिस ठाण्यात आला. मी कोल्हापूर येथून आलो असून, मी माझ्या पत्नीवर चाकूने वार करून तिला घरात बंद करून आलो असल्याचे सांगितले. फौजदार चावडी पोलिसांनी लागलीच कोल्हापूर पोलिसांशी संपर्क साधून विचारणा केली. शुभांगी आणि सचिन दोघे जण गप्पा मारत बसले होते. यावेळी शुभांगी बेसावध असताना सचिनने शुभांगीच्या चेहरा, गळा आणि पोटावर चाकूने वार केल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले.यामध्ये संबंधित पत्नीचा मृत्यू झाल्याचे आढळून आले आहे.

## जागतिक पर्यावरण दिनी मंत्रालयात एकल प्लास्टिक वापराविरुद्ध अभियान

दैनिक आपला विदर्भ


**मुंबई/प्रतिनिधी :** जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने ५ जून रोजी सकाळी मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी हे त्यांच्या वापरातील एकल प्लास्टिक टाकून देणार असून प्लास्टिक वापरणार नाही अशी शपथ घेणार आहेत. पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात येणार आहे. दरवर्षी ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिवस साजरा केला जातो. या वर्षाची पर्यावरण दिवसाची संकल्पना (थीम) 'जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचा अंत करणे' (एपवळपस झश्रर्रीींळल झेश्रश्रीींळेप त्रथ्रेलरश्रश्र) अशी आहे. ही संकल्पना केंद्र शासनाने स्विकारलेल्या मिशन लाईफशी संलग्न आहे. मिशन लाईफमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्विकार करण्यात आला आहे. त्यामध्ये एकल वापराच्या प्लास्टिकला नकार देणे व प्लास्टिकचा कचरा रोखणे या बाबींचा समावेश आहे. पर्यावरणास सर्वात जास्त धोका प्लास्टिकमुळे होणाऱ्या प्रदुषणाचा आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाचा पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग एकल वापराच्या प्लास्टिक बंदीसाठी वेगवेगळे उपक्रम राबवित आहे. या मोहिमेची सुरुवात मंत्रालयापासून करण्यात येणार असून दि. ५ जून रोजी सकाळी मंत्रालयाच्या त्रिमूर्ती प्रांगणात प्लास्टिकला पर्याय म्हणून कापडी पिशव्यांचे वाटप पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते होणार आहे.

## पुण्यात ३ अर्धवट जळालेल्या मृतदेहांचे गूढ उलगडले; मॉम डॅड टॅटूवरुन क्लू सापडला अन आरोपी सापडला

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यात शिरूर रांजणगाव मध्ये काही दिवसांपूर्वी अर्धवट जळालेल्या अवस्थेत तीन मृतदेह आढळले होते. आता या घटनेतील आरोपीचा पोलिसांनी शोध घेतला आहे. पुणे ग्रामीण पोलिसांनी महिलेच्या हातावर असलेल्या जय भीम राजरत्न, मॉम, डॅड आणि आर. एस या टॅटूच्या आधारे मृतदेहाची ओळख पटवून आरोपीचा शोध घेतला. मृत महिला व तिच्या नवऱ्यामध्ये नेहमी भांडण होत होते. त्यामुळे आरोपी गोरख बोखारे हा त्यांच्यामधील वाद मिटवत असे. त्याचदरम्यान आरोपी गोरख बोखारे आणि मृत स्वाती सोनवणे यांच्यात प्रेमसंबंध तयार झाले. त्यामुळे स्वाती ही गोरख बोखारे याच्यासोबत





लग्न करण्याची मागणी करत होती.

आरोपीने मोटरसायकलवर मृत स्वाती सोनवणे व तिच्या दोन्ही मुलींना आळंदीतून घेऊन सरहद वाडी शिरूर येथे आला. रात्रीच्या वेळी रांजणगाव गणपती गावाजवळ बंद असलेल्या कंपनीत कच्च्या रोडलगत थांबून स्वाती आणि तिच्या दोन्ही मुलांना गळा आवळून व डोक्यात दगड घालून खून केला. त्यानंतर पेट्रोल टाकून जाळून टाकत पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. मात्र, या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यावर पोलिसांनी १२ दिवसांतच गुन्ह्यातील आरोपीला पकडलं आहे. पोलिसांनी २७ कर्मचाऱ्यांच्या टीमसह २५० सीसीटीव्ही तपासून १६ हजार ५०० भाडेकरू कडून माहिती घेतली. ज्याठिकाणी मृतदेह सापडले त्या रस्त्याने जाणाऱ्या लोकांकडे तपास केला. सहा पथक तयार करून त्यांना तपासला पाठवलं. कोल्हापूर, औरंगाबाद, नाशिक व कोकण परिक्षेत्रात तपास केला. तसेच पुणे ग्रामीण पोलीस स्टेशनमधील ३३ पोलीस स्टेशनचे तपास पथकातील प्रत्येक तपास करत होता. अखेर आरोपीला पकडण्यात पोलिसांना यशआलंआहे.

## संक्षिप्त...

### स्वतःला प्रसिद्धी मिळावी म्हणून लक्ष्मण हाके हे अजित पवार यांच्यावर बेताल वक्तव्य करत आहेत - राजेश विटेकर



दैनिक आपला विदर्भ

**परभणी/प्रतिनिधी :** दोन दिवसांपूर्वी मुंबई येथे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या उपस्थितीत परभणी जिल्ह्यात पीक विमा कंपनीकडून शेतकऱ्यांवर अन्याय झाल्याच्या अनुषंगाने बैठक संपन्न झाली. या बैठकीत पीक विमा कंपनीने केलेला खोटारडेपणा समोर आला. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी त्यात शनि पीक विमा कंपनीला परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तात्काळ पीक विमा अदा करण्याचे आदेश दिले. त्यामुळे आता जिल्ह्यातील अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना पीक विमा मिळणार असल्याचे आमदार राजेश विटेकर म्हणाले. तसेच सध्या ओबीसी नेते लक्ष्मण हाके हे अजित पवर यांच्या विषयी बेताल वक्तव्य करत आहेत. ते हे वक्तव्य स्वतःला प्रसिद्धी मिळावी, यामुळेच करत आहेत. कारण मोठ्या नेत्या विषयी काहीतरी वक्तव्य केल्यानंतर त्याला प्रसिद्धी मिळते आणि त्या अनुषंगाने लक्ष्मण हाके हे अजित पवार यांच्या विषयी बोलत असल्याचेही आमदार राजेश विटेकर म्हणाले.

### चोपड्यात नवजात स्त्री जातीचे अर्भक सापडल्याने खळबळ, अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल





दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** चोपडा शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीत आडगाव विरवाडा रस्त्यालगत शेतात कोणीतरी अज्ञात व्यक्तीने नुकतेच जन्मलेले स्त्री जातीचे अर्भक फेकून दिले होते. हे संतापजनक कृत्य अज्ञात व्यक्तीने रात्री केले असल्याने सकाळी शेतकरी मशागत करण्यासाठी शेतात गेले असता त्या ठिकाणी नवजात स्त्री जातीचे अर्भक आढळून आले. शेतकऱ्यांनी तात्काळ शहर पोलीस स्टेशनला ही माहिती कळवल्यानंतर घटनास्थळी पोलिस दाखल होत पोलिसांनी तपास सुरु केला. पोलिसांनी अर्भक ताब्यात घेतले असून, पंचनामा देखील केला आहे. चोपडा शहर पोलीस स्टेशनला अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस पुढीला तपास करत आहेत.

### नांदेड – ईद-उल-अजहा उत्साहात आणि भक्तिभावात साजरी, देश-विदेशात शांततेसाठी विशेष प्रार्थना

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** पवित्र ईद-उल-अजहा (बकरी ईद) नांदेड शहरात उत्साह, शांतता आणि धार्मिक वातावरणात मोठ्या भक्तिभावाने साजरी करण्यात आली. ईदची नमाज सकाळी ठीक ८ वाजता पाकीजा नगर, देगलूर नाका येथील ईदगाह मैदानावर शांततेच्या वातावरणात अदा करण्यात आली. हजारो मुस्लीम बांधवांनी एकत्र येत नमाज अदा केली.

मुफ्ती खलीलुर्रहमान साहेबांनी हजरत इब्राहीम (अ.स.) यांच्या बलिदानाची महती सांगितली. त्यांनी नमूद केलं की, ''आजच्या तरुण पिढीमध्ये धर्मापासून दुराव्याचं प्रमाण वाढत आहे. नमाज, कुरआन यापासून दूर जाऊन भोगवादाकडे वळल्यामुळे दुःख, संकट, अपमान आणि अडचणी येत आहेत. तरुणांनी धर्माशी नाळ घट्ट जोडणं ही काळाची गरज आहे.'' त्यानंतर काझी झुबैर साहेबांनी पारंपरिक अरेबी भाषेत खुतबा (प्रवचन) दिलं. मौलाना साद अब्दुल्ला साहेबांनी नमाज अदा केली आणि त्यानंतर विशेष दुआ करण्यात आली.

या दुआत संपूर्ण जगात शांतता, एकोपा आणि स्थैर्य, फिलिस्तीनमधील पीडित मुस्लिम बांधवांसाठी, तसेच आपल्या देशात सौहार्द व भाऊचाऱ्याचं वातावरण टिकून राहावं, आजारी व्यक्तींच्या आरोग्यासाठी, दिवंगत आत्म्यांसाठी, अडचणीत असलेल्या कुटुंबांसाठी आणि विवाहाच्या प्रतिक्षेत असलेल्या तरुण-तरुणींसाठी प्रार्थना करण्यात आली.

# बुलढाणा आगारात पाच नवीन एसटी बस

## आमदार संजय गायकवाड यांच्या प्रयत्नांना यश

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा आगारातील बसेसची अवस्था अत्यंत दयनीय झाल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांसह शहरी भागात लांब पल्ल्याचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना जिव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असल्याचे लक्षात घेऊन बुलढाण्याचे शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी बुलढाणा जिल्ह्यात ४६० एसटी बसेस ची मागणी केली होती. मंत्री प्रताप सरनाईक यांच्या कडे बुलढाणा एसटी आगारात ५० ते ६० बसची मागणी केली





केली. यापैकी पाच गाड्या आता बुलढाणा आगारात दाखल झाल्या आहेत. बुलढाणा एसटी आगारात प्रवाशांच्या सोयीसाठी राज्यमार्ग परिवहन महामंडळाने पाच नवीन एसटी बसेस उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे सामान्य प्रवाशांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. तर पुढील टप्प्यात येणाऱ्या गाड्यांमध्ये टीव्ही आणि इतर सोयी सुविधा उपलब्ध करण्यात येणार असल्याचे गायकवाड यांनी सांगितले आहे.

## विविध वृत्त...

### नागपुरतील पांचपावली पोलिसांनी सराईत चोरट्यांना अटक करून १० लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपुरात अनेक ठाण्यात मोटारसायकल चोरींच्या घटना वाढल्या मुळे पोलिसांनी मोटारसायकल चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगार वरती बारीक लक्ष ठेवूत पांचपावली पोलिसांनी एका बालगुन्हेगारला ताबायत घेतल. या बालगुन्हेगार ला विचारपूस कयांचा कडून ९ मोटारसायकल आणि दोन घरफोडी चे गुन्हे उघडकीस आणले सबोतच १० लाखांचा मुधे माल पकडला आहे. पुढील तपास पांचपावली पोलीस करत आहे.

### भारत- चीन दरम्यान या आजाराबाबत स्पर्धा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले:

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** करोना आजाराबाबत आजही चीन या देशाकडे संपूर्ण जग संशयाच्या नरजेने बघत आहे. त्यातच नागपुरातील हॉटेल सेंटर पॉईंट येथे शनिवारी झालेल्या हॅलो डायबेटिज अॅकेडमिया या मधूमेहावरील परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारत व चीन या दोन्ही देशातील एका आजाराबाबत महत्वाचे भाष्य केले. त्याबाबत आपण जाणून घेऊ या.

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, भारत मधूमेहाची राजधानी होऊ बघत आहे. येथे लठ्ठपणा व मधूमेहाचे रुग्ण वाढत आहे. सध्या भारत आणि चीन या दोन देशात मधूमेह रुग्ण संख्या बघता या आजाराच्या रुग्ण वाढीची स्पर्धा दिसत आहे. हे चुकीची असून ही स्पर्धा इतर गोष्टीत हवी. पूर्वीच्या तुलनेत आता खानपान व जिवनशैलीतील बदल, व्यायामाचा अभावासह इतर कारणांनी वाढते आजार बघत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फिट इंडियासह इतरही चांगले उपक्रम हाती घेतले. परंतु आताही या उपक्रमात मोठ्या प्रमाणात काम करण्याची गरज आहे.

मधूमेह हा व्यक्तीला पोखरणारा आजार आहे. योग्य काळजी न घेतल्यास मधूमेहग्रस्तांना बऱ्याच गंभीर सहआजाराचा धोका वाढतो. नागपुरातील मधूमेह तज्ज्ञांच्या जागतिक परिषदेत नवनवीन संशोधन, उपचाराची पद्धतीसह नावीन्यपूर्ण उपक्रमावर चर्चा होणार आहे. येथे गर्भधारणा झालेल्या महिलेची तेव्हापासून योग्य काळजी घेतल्यास भविष्यात तिच्या होणाऱ्या मुलाला मधूमेहाचा धोका टाळण्याबाबतही चांगले काम होत आहे. या पद्धतीने आपण प्रत्येकाने काळजी घेतल्यास नवीन पिढी मधूमेहापासून वाचवणे शक्य असल्याचेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. परिषदेला प्रामुख्याने मंचावर डॉ. बंसी साबू, डॉ. कमलाकर त्रिपाठी, डॉ. शशांक जोशी, डॉ. सुनील गुप्ता, डॉ. कविता गुप्ता, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे प्रशासक डॉ. विंकी रुघवानी, डॉ. ए. के. दास, डॉ. राती मक्कर हे देश- विदेशातील तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित होते.

भारतात आजही मधूमेहाचे ६० टक्के रुग्ण आम्हाला हा आजार होऊ शकत नाही, होणार नाही अशा नकारात्मक भूमिकेत दिसतात. हे चुकीचे आहे. मधूमेहावर योग्य उपचार व आवश्यक काळजी घेतल्यास हा आजार नियंत्रणात राहू शकतो, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मधुमेह व लठ्ठपणावर नियंत्रण शक्य- डॉ. गुप्ता

पोटातील चरबी, शरीर, लठ्ठपणामुळे २०० हून जास्त आजार होतात. पश्चिमात्य देशाच्या तुलनेत भारतात मधुमेहाचे रुग्ण जास्त वेगाने वाढत आहेत. त्यामुळेच भारतात रक्तदाब, हृदयविकारासह इतरही अनेक गंभीर आजार वाढत आहेत. मधूमेह, रक्तदाबाचा धोका जिवनशैलीतील बदल, योग्य औषधोपचारासह तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्यानुसार वागल्यास मधुमेह, लठ्ठपणावर नियंत्रण शक्य आहे, असे मत मधुमेह तज्ज्ञ डॉ. सुनील गुप्ता यांनी व्यक्त केले.

### गोंडस मुलीला जन्म देताच १५ दिवस उपाशीपोटी डांबून शारीरिक छळ, तान्हुल्या बाळाला घेऊन माहेर गाठलं, इंजिनीयर पतीच्या विकृतीने बीड हादरलं

**बीड/प्रतिनिधी :** मुलगी नकोय या बुरसटेलेल्या मानसिकतेने पुन्हा एकदा डोकं वर काढलं.. मुलगी जन्माला आली म्हणून बीडच्या माहेरवासिनीला चक्क १५ दिवस उपाशीपोटी डांबून तिचा छळ करण्यात आला. घटना सुसंकृत मानल्या जाणाऱ्या पुण्यात घडली. संधी मिळताच तान्हुल्या बाळाला घेऊन विवाहितेने बीड गाठले आणि बीडच्या शिवाजीनगर पोलिसांत तक्रार दिली. याप्रकरणी सासरच्या चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलाय.

सासरच्या अमानुष जाचातून कशी सुटका झाली हे सांगताना अश्रू अनावर झालेली ही आहे शिवानी चंदनशिवे... हतबल आणि निराश होऊन तिने अखेर माहेरचा आसरा घेतला आहे.

## १० तास जेसीबी चालवून अर्धवट काम करुन ८ लाखाचे बोगस बिल उचलले तरीही यावर कारवाई होईल का ?

**जालना/प्रतिनिधी :** गावातील रस्त्याचे काम अर्धवट सोडून ठेकेदारांने पूर्ण कामाचे बिल उचलून घेतल्याचा प्रकार जालना तालुक्यातील हस्ते पिंपळगाव येथे उघडकीस आला असून रस्त्याचे काम पूर्ण करावे, या मागणीसाठी ग्रामस्थांनी शुक्रवारी ( दि. ६) थेट जिल्हा परिषद कचेरी काढून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसमोर रस्त्याअभावी होणारी कैफियत मांडली.

जालना तालुक्यातील हस्ते पिंपळगाव येथे जालना जिल्हा परिषद अंतर्गत सुधारणा मंजुरीतून हस्ते पिंपळगाव ते शेवगा रस्त्याचे काम दोन वर्षापूर्वी मंजूर झाले होते. रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराने काम अर्धवट सोडून पूर्ण काम केल्याचे बिल उचलले असल्याची तक्रार केशव अंबादास शिंदे व ग्रामस्थांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय आयुक्त यांच्याकडे केली होती. २६ मे २०२३ रोजी तलाठी व मंडळाधिकाऱ्यांनी अर्धवट कामाचा पंचनामा केला. रस्ता अर्धवट व नाली बांधकाम न झाल्याने ग्रामस्थांना येण्या- जाण्यासाठी त्रास होत असल्याची तक्रार घेऊन केशव शिंदे, गजानन नानोटे यांच्या नेतृत्वाखाली महिला- पुरूष मंडळींनी शुक्रवारी ( दि. ६) थेट जिल्हा परिषद कचेरी गाठली. मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनियार हे परगावी असल्याने या ग्रामस्थांनी उपलब्धप मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र तुबाकले यांची भेट घेऊन त्यांच्या समोर रस्त्याची कैफियत मांडली.

## आदर्श जीवनशैलीतून मधुमेह टाळता येणे शक्य-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** पारंपारिक जीवनशैलीतून विकसित झालेल्या आहारविषयक सवयींमध्ये शहरीकरणामुळे अनुचित बदल झाले आहेत. त्याचा दुष्परिणाम म्हणून कमी वयात विविध आजार बळावत आहेत. आदर्श जीवनशैलीचा स्वीकार करून मधुमेहापासून दूर राहता येणे शक्य असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

डायबिटीज केअर अँड रिसर्च सेंटर व डायबिटीज केअर फाउंडेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने 'हॅलो डायबिटीज' या बाराव्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन हॉटेल सेंटर पॉइंट येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आले.

परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुनील गुप्ता, डॉ. रती मकर, पद्मश्री डॉ. शशांक जोशी, पद्मश्री डॉ. कमलाकर त्रिपाठी, डॉ. ए.के. दास, डॉ. बन्शी साबू, डॉ. विंकी रुघवानी, डॉ. कविता गुप्ता, चिकित्सक, तज्ज्ञ व वैद्यकीय क्षेत्रातील अभ्यासक यावेळी उपस्थित होते.

भारतात मोठ्या प्रमाणात पसरत जाणारा मधुमेह आणि ओबेसिटी ही गंभीर व चिंतेची बाब असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, भारत ही मधुमेहाची राजधानी होऊ नये यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या अशा जनजागृतीपर परिषदांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे निर्माण होणाऱ्या आजारांना दूर ठेवण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी फिट इंडिया मुव्हमेंट या सारखे विविध उपक्रम हाती घेतले असून यातून आरोग्य विषयक जनजागृतीला प्राधान्य दिले जात आहे.

मधुमेह या आजारावर अधिक सखोल संशोधन होणे ही काळाची गरज असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, या परिषदेच्या माध्यमातून मधुमेह जडण्याची कारणे, उपाय व आदर्श जीवनशैली या विषयांवर जनजागृती होणे गरजेचे आहे. मनुष्याच्या शारीरिक क्षमता क्षीण करणाऱ्या या आजारावर जनजागृती हाच प्रथम व प्रभावी उपचार आहे. गरोदर स्त्रियांना व त्यातून पुढे नवजात बालकांना होणारा मधुमेह रोखण्याचे आव्हान तज्ज्ञांसमोर आहे. या परिषदेच्या माध्यमातून सकारात्मक निष्कर्ष प्राप्त झाल्यास येणारी पिढी निश्चितच मधुमेहमुक्त राहील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

डायबिटीस हा आजार झालेला असतानाही तो न स्वीकारण्याची मानसिकता असणे ही आपल्या येथील सर्वात मोठी समस्या आहे. यासाठी या आजाराची भीती न बाळगता औषधोपचार करण्यासोबतच जीवनशैलीत सुधार आणण्याबाबत योग्य मार्गदर्शन या परिषदांमधून होणे अपेक्षित असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. या परिषदेतील डायबिटीस आजाराविषयीचे देशभरातील तज्ज्ञ व चिकित्सकांचे विचारमंथन या संदर्भातील उपचारांसाठी दिशादर्शक ठरेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मधुमेह रोखण्यासाठी डॉ. सुनील गुप्ता सातत्याने जनजागृती करत असून त्यांनी यासाठी आतापर्यंत असंख्य कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. विविध माध्यमातून ते संशोधन प्रसिद्ध करत आहेत. हे कार्य त्यांनी अविरत सुरु ठेवावे, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी त्यांचा गौरव केला. डॉ. सुनील गुप्ता यांनी प्रास्ताविक केले.

या परिषदेत मधुमेहाची कारणे, उपाय व आदर्श जीवनशैली या विषयांवर चर्चा होणार असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित मधुमेह तज्ज्ञ या परिषदेत सहभागी झाले असल्याचे त्यांनी सांगितले. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेत मधुमेहाशी संबंधित सादरीकरण होणार असून विविध कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे.

## जलसंधारण विभागाच्या बृहत आराखड्यासाठी पुण्यात दोन दिवशीय कार्यशाळा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** नैसर्गिक साधनसंपत्तीवर आधारित राज्यातील ग्रामीण भागाचा आर्थिक विकास करण्याच्या दृष्टीने मृद व जलसंधारण विभाग काम करतो. या विभागाकडे जलसंधारण, मृदसंधारण, एकात्मिक पाणलोट विकास लघु सिंचन, पडीक जमीन विकास यासारख्या महत्वपूर्ण योजनांचे संनियंत्रण केले जात असल्याने विभागासाठी सुधारित बृहत आराखडा तयार करण्यात येणार आहे. आराखडा तयार करण्यासाठी विभागातर्फे जलतज्ज्ञ, विविध विषयातील तज्ज्ञ, विभागाचे अधिकारी यांची दोन दिवसीय कार्यशाळा येत्या आठवडाभरात घेण्यात येणार असल्याची माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिली.

मंत्रालयात जलसंधारण विभाग आणि महामंडळाच्या आढावा बैठकीत मंत्री श्री. राठोड बोलत होते. यावेळी विभागाचे सचिव गणेश पाटील, जलसंधारण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक सुनिल कुशिरे यांच्यासह सर्व प्रादेशिक जलसंधारण अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री. राठोड म्हणाले की, जलसंधारण विभाग हा ग्रामीण भागाचा कणा आहे. यामध्ये तांत्रिक बदल होण्याच्या दृष्टीने सुधारित आराखडा करण्यात येणार आहे. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानंतर विभागातील अधिकाऱ्यांनी प्राधान्याने परिपूर्ण आराखडा तयार करावा.

अपूर्ण, रखडलेले जलसंधारण प्रकल्प होणार रद्द

गेल्या कित्येक वर्षांपासून जलसंधारणची कामे राज्यात सुरू आहेत. मात्र काही तांत्रिक कारणे, अडचणी, नागरिकांचा विरोध यामुळे विविध प्रकल्प पूर्ण होवू शकले नाहीत, असे प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. यानुसार जलसंधारणचे ८७२ आणि जलसंधारण महामंडळाकडील ३९५ प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती श्री. राठोड यांनी दिली. २००१ ते २००६ पर्यंतच्या अपूर्ण प्रकल्पाबाबत नव्याने माहिती घेवून पुन्हा प्रस्ताव सादर करावा, शिवाय प्रगतीपथावर असलेली कामे पारदर्शी आणि गतीने होण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

जलयुक्त शिवारची पुस्तिका तयार होणार

राज्यात जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवारची कामे मोठ्या प्रमाणात झाली आहेत. जलयुक्त शिवारच्या कामाबाबत परिपूर्ण माहिती जिल्हानिहाय करायची आहे. यामध्ये यशकथा, कामाची सद्यस्थिती, प्रगतीपथावरील कामे याबाबतची एकसारखी माहिती पुस्तिका जिल्हानिहाय तयार करण्याच्या सूचनाही मंत्री श्री. राठोड यांनी दिल्या.

जलसंधारण अधिकारीऐवजी अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपअभियंता अशी पद नामावली तयार करण्याबाबतचा प्रस्ताव त्वरित सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

राज्यात जिथे पाऊस नाही, तिथल्या मामा तलावांची कामे त्वरित करून घ्या. अमृत सरोवरे, झरे यांचे बळकटीकरण करण्याच्यादृष्टीने आपापल्या परिसरात पाहणी करावी. पायलट प्रकल्प म्हणून प्रत्येक विभागात पाच झऱ्यांचे तपासणी करण्याच्या सूचना सचिव श्री. पाटील यांनी दिल्या.

## आपत्तीमध्ये नागरिकांचे जीवन सुसह्य करण्यासाठी काम करावे : मुख्यमंत्री

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** आपत्तीमध्ये जीवित व वित्त हानी सोबतच पायाभूत सोयी - सुविधांचे होणारे नुकसान कमी करण्यासाठी प्रयत्न करावीत. आपत्तीमध्ये सामान्य नागरिकांचे जीवन सुसह्य व्हावे, त्यांना आपत्तीची झळ बसू नये यासाठी आपत्ती व्यवस्थापनात दर्जेदार काम करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. त्याचबरोबर आपत्ती व्यवस्थापनाचा निधी सौम्यीकरण कामासाठी खर्च व्हावा. तसेच पावसानंतर नुकसान झालेले रस्ते, बंधारे, वीज वाहिन्या दुरुस्ती कामासाठीसुद्धा या निधीचा उपयोग करावा, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

सह्याद्री अतिथीगृहात राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव सुजाता सौनिक आदी उपस्थित होते.

राज्य आपत्ती व्यवस्थापनाचा आढावा घेताना मुख्यमंत्री म्हणाले, पूर रेषा केवळ खूण म्हणून न ओळखता पूर रेषेच्या आत अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी. यासाठीचे सर्व्हेक्षण करताना अचूकतेसाठी उपग्रहाद्वारे मॅपिंग करावे. आपत्ती व्यवस्थापनामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करावा. कोकण आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत घेण्यात येत असलेल्या भूमिगत वीज वाहिन्या, धूप प्रतिबंधक बंधारे, बांध घालणे, बहुउद्देशीय चक्रीवादळामधले



आसरे बांधणे, दरडप्रवण क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाययोजनांची आणि वीज अटकावची कामे गतीने करावीत.

आपदा मित्रांना आवश्यक प्रशिक्षण देऊन त्यांचा डाटाबेस तयार करावा. आपदा मित्रांना ओळखपत्र देण्यात यावे, अशा सूचना देत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, येणाऱ्या प्रत्येक आपत्तीला सामोरे जाताना मागील परिस्थितीचा अनुभव लक्षात घेऊन त्यानुसार अचूक नियोजनद्वारे अंमलबजावणी करावी. आपत्तीसंदर्भात सर्वंकष अभ्यास करून ग्राम पंचायतींना आपत्ती व्यवस्थापनाचे कीट उपलब्ध करून द्यावे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

नद्यांची वहन क्षमता वाढवण्यासाठी नदी स्वच्छ करून नदीतील गाळ काढणे, राडा रोडा काढणे आवश्यक आहे. या कामास जलसंपदा विभागाने प्राधान्य द्यावे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

आपत्ती व्यवस्थापनासाठी ग्रामपंचायतींना आपत्ती व्यवस्थापन किट देत असताना आवश्यक मनुष्यबळाचे प्रशिक्षणही देण्यात यावे. किट मधील साहित्याचा अपघाताच्या वेळी मदत कार्यात उपयोग होऊ शकतो. त्यामुळे ग्रामपंचायतींना किट देण्याबाबत कार्यवाही व्हावी, असे आपत्ती व्यवस्थापन मंत्री श्री. महाजन यावेळी म्हणाले.

बैठकीत महाबळेश्वर व पाचगणी येथील विद्युत वाहिन्या भूमिगत करून वादळ वाऱ्यामुळे भविष्यात होणारे संभाव्य नुकसान टाळण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. बैठकीस मुख्यमंत्री सचिवालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, मदत, पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या अपर मुख्य सचिव सोनिया सेठी, आपत्ती व्यवस्थापन व विभागाचे संचालक सतीशकुमार खडके उपस्थित होते. मदत, पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या अपर मुख्य सचिव सोनिया सेठी यांनी बैठकीत सादरीकरण केले.